**Title :**
**Author :**
**Location :**
**Article Date : 12/29/2016**

# औद्योगिक क्षेत्राची शैक्षणिक सहल

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

वस्तूनिर्माण उद्योग संस्थांचे कामकाज कसे चालते, नव्या उद्योगसंस्थांच्या नव्या पिढीकडून काय अपेक्षा असतात हे जाणून घेण्याच्या हेतूने डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ स्टडीज तर्फे विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक क्षेत्राची एक शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. उद्योग संस्था आणि शैक्षणिक संस्था यांना एकत्र आणण्यासाठी या क्षेत्रीय भेटीची आखणी करण्यात आली होती.

कॅम्लिन आणि कोकुयो या दोन कंपन्यांच्या विलीनीकरणानंतर झालेले बदल, व्यावसायिक सामाजिक जबाबदारी आणि त्याच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांचे समाधान याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. वस्तू निर्माण विभागातील प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना कंपनीचे विविध प्रक्रिया विभाग प्रत्यक्षपणे दाखवले. त्यामुळे अभ्यासक्रमात असलेली औद्योगिक संबंधी धोरणे विद्यार्थ्यांना येथे व्यापकपणे उमजली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रात प्राविण्य मिळवण्यासाठी उपयोग होणार आहे.